<u>प्रेस नोट</u>

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २०.१०.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २. | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १. श्री.देवीदास जंगुजी परतेती ,वय ५२ वर्षे, पद – उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अचलपूर, रा. जयगुरु नगर, मोर्शी जि.अमरावती. वर्ग– २.<br>२. श्री.अमोल हंसराज गिरी, वय ४१ वर्षे, पद – सहाय्यक नझुल परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय अचलपुर, रा.भक्ती धाम मंदिराजवळ, साई नगर अमरावती. वर्ग– ३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २०/१०/२०२२ चे १६/०५ ते १६/२० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | १५,०००/– रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | ८,०००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ४,०००/– रुपये |
| ७ | घटनास्थळ | उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय अचलपूर परिसर |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक १२/०९/२०२२ रोजी त्यांचे वडीलोपार्जीत शिट नं.२५ मधिल प्लॉट नं.१०८ चे प्राप्रर्टी कार्ड वरील मयत प्रभावतीबाई त्रिपाठी यांचे नाव कमी करण्यासाठीचे फाईल क्लिअर करण्यासाठी श्री.अमोल गिरी व श्री.परतेती, उप अधिक्षक,भुमी अभिलेख, अचलपूर कार्यालय, अचलपूर यांनी १५,०००/–रु.लाचेची मागणी करीत असल्याबाबत सविस्तर तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दि.१२/०९/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांना त्यांचे वडीलोपार्जीत शिट नं.२५ मधिल प्लॉट नं.१०८ चे प्राप्रर्टी कार्ड वरील मयत प्रभावतीबाई त्रिपाठी यांचे नाव कमी करण्यासाठीचे फाईल क्लिअर करण्यासाठी १५,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ८,०००/– रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक २०/१०/२०२२ आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान श्री.अमोल गिरी यांनी कमी करण्यासाठीचे फाईल क्लिअर करण्यासाठी पंचासमक्ष ४,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारल्याने आरोपी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. परतवाडा, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती श्री.सजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती, श्री.शिवलाल, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.सतीश उमरे, पो.नि.योगेशकुमार दंदे, पो.ना.युवराज राठोड, विनोद कुंजाम, कुणाल काकडे, पो.कॉ.शैलेश कडू,यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क : अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती ऑफीस**
**फोन नं.०७२१–२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१**
**टोल फ्रि नंबर – १०६४**

(सतीश उमरे)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.न.७०२०६९३४८१